
SAMPLE CONTENT

PERFECT

# इतिहास व राज्यशास्त्र

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित



इयत्ता
नववी
(मराठी माध्यम)

मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित

PERFECT

# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता नववी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

☞ अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित

☞ प्रत्येक पाठात अंतर्भूत असलेल्या बाबी:
- ‘एक दृष्टिक्षेप’ शीर्षकांतर्गत पाठाचा संपूर्ण आढावा.
- बोर्डाच्या कृतिपत्रिकेनुसार विविध प्रश्नप्रकारांचा समावेश.
- पाठ्यपुस्तक स्वाध्यायातील सर्व प्रश्नांचा समावेश.
- पाठाच्या संपूर्ण आकलनाकरिता अधिकच्या प्रश्नांचा समावेश.
- ‘पाठांतर्गत प्रश्न’ या विभागात सर्व पाठांतर्गत प्रश्नांचा समावेश व आवश्यकतेनुसार उत्तरे अंतर्भूत
- पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनाकरिता Q.R. Code द्वारे पाठाची उजळणी उत्तरांसह समाविष्ट.

☞ सखोल अभ्यासासाठी व अभिरुचीकरीता अंतर्भूत वैशिष्ट्ये :
- आकलन हेतू स्पष्टीकरण
- ज्ञानगुरू

Sample content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007
TEID: 3705
P.O. No. 14046

# प्रस्तावना

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,

शिक्षण मंडळाने ज्ञानरचनावादावर आधारित तयार केलेल्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता व निरीक्षण क्षमता वाढीस लागेल. विद्यार्थ्यांची आकलन व उपयोजन क्षमता विकसित करणाऱ्या या अभ्यासक्रमाचे विश्लेषण करून तयार केलेल्या लेझी बोन एज्युकेशनचे **PERFECT इतिहास व राज्यशास्त्र : इयत्ता नववी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

प्रत्येक पाठात अंतर्भूत बाबी :

- 'एक दृष्टिक्षेप' शीर्षकांर्गत पाठाचा संपूर्ण आढावा
- पाठाच्या ओघानुसार पाठाधारित प्रश्न व अधिकचे प्रश्न
- बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यानुसार विविध प्रश्नप्रकारांचा गुणांसह समावेश
- या विषयातील संकल्पना अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने प्रश्न :
  कालरेषा, संकल्पनाचित्र, ओघतक्ता
- बोर्डाच्या परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या उताऱ्यावर आधारित व चित्रावर आधारित प्रश्नांचा विद्यार्थ्यांना सराव व्हावा या दृष्टीने इतिहासातील काही पाठांमध्ये या प्रकारच्या प्रश्नांचा समावेश
- 'पाठांतर्गत प्रश्न' या शीर्षकाखाली पाठ्यपुस्तकातील पाठांतर्गत प्रश्न सोडवून दिले आहेत, तसेच उपक्रम सोडवण्यासाठी मार्गदर्शनपर मुद्दे व संकेतस्थळांचे संदर्भ देण्यात आले आहेत.
- उत्तराच्या उत्तम आकलनाकरता आकलन हेतू स्पष्टीकरणाद्वारे अधिक माहिती देण्यात आली आहे.
- स्वंयमूल्यमापनाकरिता पाठाच्या शेवटी Q.R.Code द्वारे पाठाची उजळणी उत्तरांसह समाविष्ट करण्यात आली आहे.

या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा इतिहास व राज्यशास्त्र या विषयाबाबतचा दृष्टिकोन अधिक व्यापक होईल, तसेच या विषयातील रुची वाढेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता. support@lazybone.in

***इतिहासासारखा दुसरा शिक्षक नाही!***

**ज्ञानार्थींना खूप खूप शुभेच्छा!**

प्रकाशक

**आवृत्ती :** चौथे

## ज्ञानगुरू



आम्ही **ज्ञानगुरू** नावाचा एक खास मित्र तुमच्या भेटीस घेऊन येत आहोत. हा तुमचा लाडका मित्र बनून या पुस्तकात तुम्हांला ठिकठिकाणी भेटेल जो अभिरुचीपूर्ण माहितीद्वारे तुमचे ज्ञान वाढवण्यास व संकल्पना स्पष्ट करण्यास मदत करेल. इतिहासाची वर्तमानाशी सांगड घालता यावी यासाठी आम्ही केलेला हा एक प्रयत्न आहे. यामुळे, तुम्हांला ज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन करणे सुलभ होईल.

हा नवीन मित्र तुम्हांला नक्कीच आवडेल.

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'इतिहास व राज्यशास्त्र' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

# ठळक वैशिष्ट्ये

### एक दृष्टिक्षेप

'एक दृष्टिक्षेप' या शीर्षकांतर्गत पाठाचा परिचय मुद्‌दे व तक्ते या स्वरूपात देण्यात आला आहे.

### विविध प्रश्नप्रकार अंतर्भूत

संपूर्ण पाठ प्रश्नोत्तराच्या स्वरूपात देण्यात आला आहे. यात पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नांचा जसे की दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा, पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा, संकल्पना चित्र पूर्ण करा, तक्ता पूर्ण करा, टिपा लिहा, इत्यादी प्रश्न प्रकारांचा समावेश बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यानुसार क्रमाने करण्यात आला आहे.

### उताऱ्यावर आधारित व चित्रावर आधारित प्रश्न

बोर्डाच्या परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या उताऱ्यावर आधारित व चित्रावर आधारित प्रश्नांचा विद्यार्थ्यांना इयत्ता ९वी पासून सराव व्हावा या दृष्टीने इतिहासातील काही पाठांमध्ये या प्रकारच्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

### मुद्‌द्यांच्या स्वरूपात उत्तरे

विद्यार्थ्यांना आशयाचे आकलन सहजतेने व्हावे या दृष्टीने सर्व प्रश्नांची उत्तरे मुद्‌द्यांच्या स्वरूपात दिली आहेत.

### आकलन हेतू स्पष्टीकरण

विद्यार्थ्यांना प्रश्नांच्या उत्तरांमागची मूळ संकल्पना व मुद्‌दे व्यवस्थित समजून घेता यावेत, यासाठी आवश्यक तेथे आकलन हेतू स्पष्टीकरण (उत्तराचा भाग नसलेले) देण्यात आले आहे.

### पाठांतर्गत प्रश्न

'पाठांतर्गत प्रश्न' या शीर्षकाखाली यादी करूया, करून पाहा यांसारख्या पाठांतर्गत प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश केला आहे.

### पाठाची उजळणी

विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापन करता यावे यासाठी पाठाच्या शेवटी Q.R.Code द्‌वारे पाठाची उजळणी उत्तरांसह समाविष्ट करण्यात आली आहे.

### उपक्रम

आवश्यकतेनुसार उपक्रम सोडवून दिले आहेत. तसेच विद्यार्थ्यांना उपक्रम सोडवण्यास मदत व्हावी याकरता काही पाठांमध्ये मुद्‌दे देण्यात आले आहेत.

### ज्ञानगुरू

विद्यार्थ्यांना पाठातील आशयासंबंधित अधिकची अभिरुचीपूर्ण माहिती 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत उपलब्ध करून दिली आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्रमांक | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| १ | इतिहासाची साधने | १ |
| २ | भारत : १९६० नंतरच्या घडामोडी | ८ |
| ३ | भारतापुढील अंतर्गत आव्हाने | १९ |
| ४ | आर्थिक विकास | २७ |
| ५ | शैक्षणिक वाटचाल | ४१ |
| ६ | महिला व अन्य दुर्बल घटकांचे सक्षमीकरण | ५५ |
| ७ | विज्ञान व तंत्रज्ञान | ६५ |
| ८ | उद्योग व व्यापार | ७७ |
| ९ | बदलते जीवन : भाग १ | ८४ |
| १० | बदलते जीवन : भाग २ | ९३ |
| | **राज्यशास्त्र** | |
| १ | महायुद्धोत्तर राजकीय घडामोडी | ९९ |
| २ | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | ११२ |
| ३ | भारताची सुरक्षा व्यवस्था | १२३ |
| ४ | संयुक्त राष्ट्रे | १३१ |
| ५ | भारत व अन्य देश | १४२ |
| ६ | आंतरराष्ट्रीय समस्या | १५४ |


**[टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.**
**पाठ्यपुस्तकात प्रधानमंत्री हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे, मराठी भाषेनुसार या पुस्तकात पंतप्रधान हा शब्दप्रयोग केला आहे.]**

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

**आकलन हेतू स्पष्टीकरण या शीर्षकाखाली दिलेले स्पष्टीकरण हा उत्तराचा भाग म्हणून परीक्षेत लिहिणे अपेक्षित नाही. ते देण्यामागचा उद्देश फक्त उत्तरातील संकल्पना प्रभावीपणे विद्यार्थ्यांना समजाव्यात हा आहे.**

**१. पं.नेहरूंनी भारत-चीन संबंध सुधारण्यास मोठे योगदान दिले.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे, कारण–

i. पं.नेहरूंना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार असे म्हटले जाते. त्यांनी परराष्ट्र धोरणामध्ये अलिप्ततावादाची भर घातली.
ii. आंतरराष्ट्रवादी भूमिका घेऊन जागतिक शांतता व सुरक्षितता यांना प्राधान्य दिले.
iii. भारताच्या परकीय धोरणात चीनकडून असणारा धोकाही विचारात घेतला; मात्र शांतता हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य असल्याने सर्वच राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याला प्राधान्य दिले.

अशारीतीने, पं. नेहरूंनी भारत-चीन संबंध सुधारण्यास मोठे योगदान दिले.

**उत्तर**

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

i. १९५० पासून भारत आणि चीन यांच्यामध्ये सीमारेषेवरून तणाव होता. शिवाय, तिबेटची स्वायत्तता मान्य करण्यास चीन तयार नव्हता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता पं.नेहरूंच्या काळात भारत व चीन यांच्यात तिबेटसंबंधी पंचशील करार करण्यात आला.
ii. या करारानुसार अलिप्ततावादाचा आधार घेत दोन्ही देशांनी आपल्या सार्वभौमत्वाचा आदर करणे, परस्परांवर आक्रमण न करणे, परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, परस्पर हितसंबंध जोपासणे, शांततामय सहजीवन मान्य करणे या तत्त्वांचा स्वीकार केला.
iii. पंडित नेहरूंनी या काळामध्ये हिंदी-चिनी भाई-भाई ही घोषणादेखील दिली.

**हा उत्तराचा भाग नाही.**

Sample Content

# १ इतिहासाची साधने

इतिहास

## एक दृष्टिक्षेप

**इतिहासाची साधने**

- लिखित साधने
- भौतिक साधने
- मौखिक साधने
- दृक्-श्राव्य साधने

**लिखित साधने :** खालील साधनांचा लिखित साधनांमध्ये समावेश होतो.

i. **अभिलेखागार :** अ. ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन केले जातात, त्या ठिकाणास 'अभिलेखागार' म्हणतात.
ब. नवी दिल्ली येथील भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार हे आशिया खंडातील सर्वांत मोठे अभिलेखागार आहे.

**लिखित साधने**

- कोशवाङ्मय
- टपाल तिकिटे
- सरकारी गॅझेट
- अभिलेखागारातील कागदपत्रे
- वृत्तपत्रे
- नियतकालिके
- रोजनिशी
- ग्रंथ
- पत्रव्यवहार

ii. **वृत्तपत्रे :**

अ. आधुनिक कालखंडामध्ये वृत्तपत्रे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत, तसेच माहिती देणारी प्रमुख साधनेही आहेत.

ब. वृत्तपत्रांमधून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, राजकारण कला, क्रीडा, साहित्य, समाजकारण आणि सांस्कृतिक घडामोडी या मानवी जीवनाशी संबंधित गोष्टी माहीत होतात.

क. या माध्यमांमध्ये चळवळीची मुखपत्रे, राजकीय पक्षांची दैनिके किंवा साप्ताहिके, मासिके, वार्षिके यांचे महत्त्व असते.

ड. राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या वृत्तपत्रांच्या प्रादेशिक आवृत्त्या असून, विविध विषयांची माहिती देणाऱ्या पुरवण्याही असतात.

इ. काही वृत्तपत्रे वर्षभरातील प्रमुख घटनांचा आढावा घेणाऱ्या पुरवण्याही काढतात.

फ. **प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (PTI):**

१. १९५३ नंतर भारतातील बहुतांशी वृत्तपत्रांकरता महत्त्वाच्या घटनांचे प्राथमिक तपशील व लेख यांसाठी पीटीआय हा महत्त्वाचा स्रोत आहे.

२. अनेक वृत्तलेख, छायाचित्रे व आर्थिक, वैज्ञानिक विषयांवरील लेख 'पीटीआयने' वृत्तपत्रांना पुरवले आहेत.

३. १९९० च्या दशकामध्ये 'पीटीआयने' टेलिप्रिंटर्सऐवजी उपग्रह प्रसारण तंत्राद्वारे देशभर बातम्या पाठवायला सुरुवात केली.

४. आधुनिक भारताच्या इतिहासलेखनासाठी 'पीटीआय'चा मजकूर महत्त्वाचा आहे.

iii. **टपाल तिकिटे :**

अ. टपालखाते राजकीय नेत्यांवर, फुलांवर, प्राणी-पक्ष्यांवर, एखाद्या घटनेवर रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सव, शतक, द्विशतक, त्रिशतकपूर्तीनिमित्त तिकिट काढते.

ब. तिकिटांच्या आकारातील वैविध्य, विषयांतील नावीन्य, रंगसंगती यांमुळे टपाल तिकिटे आपणांस बदलत्या काळाविषयी सांगत असतात. त्यामुळे, तो इतिहासाचा मौल्यवान ठेवा असतो.

**भौतिक साधने :** खालील साधनांचा भौतिक साधनांमध्ये समावेश होतो.

**भौतिक साधने**

- नाणी
- प्रार्थना स्थळे
- दैनंदिन वापरातील वस्तू
- राजमुद्रा
- अलंकार
- वस्तुसंग्रहालय
- पेहराव
- आधुनिक स्थापत्य

i. **नाणी :**

अ. नाण्यांच्या माध्यमातून आणि बदलत गेलेल्या नोटांच्या छपाईद्वारे इतिहास समजतो.

Sample content

ब. १९५० ते आजतागायतची नाणी, नाण्यांत वापरलेले धातू, नाण्यांचा आकार व त्यावरील विषयवैविध्य यांवरून समकालीन भारतातील प्रश्न समजतात.

क. नोटा छापण्याचे काम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया करत असून तिचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

ii. **संग्रहालये :**

अ. संग्रहालयांवरून इतिहास समजण्यास मदत होते.

ब. भारतातील सर्वच राज्यांमध्ये त्या त्या राज्यांची वैशिष्ट्ये सांगणारी वस्तुसंग्रहालये आहेत.
उदा. मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय.

क. काही संग्रहकांची स्वत:ची अशी वैशिष्ट्यपूर्ण संग्रहालये असतात.
उदा. नाणी, नोटा, विविध आकारांतील दिवे, अडकित्ते, क्रिकेटचे साहित्य.

**मौखिक साधने :**

i. यामध्ये लोककथा, लोकगीते, म्हणी, ओव्या इत्यादींचा समावेश होतो.

ii. उदा. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये लोकशाहिर अण्णाभाऊ साठे, शाहिर अमर शेख यांच्या पोवाड्यांतून कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळत असे.

**दृक् श्राव्य साधने :**

**दृक्-श्राव्य साधने**
- दूरदर्शन
- चित्रपट
- आंतरजाल

याशिवाय विविध देशी व परदेशी वाहिन्यांचा उदा. हिस्ट्री चॅनल, डिस्कव्हरी यांचा दृक-श्राव्य साधनांमध्ये समावेश होतो.

**फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) :**

i. लोकशिक्षण देण्याच्या हेतूने भारत सरकारने १९६० साली पुणे येथे या संस्थेची स्थापना केली.

ii. 'इंडियन न्यूज रिव्ह्यू' या संस्थेने राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या क्षेत्रांतील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट न्यूज रिव्ह्यू तयार केले.

iii. याशिवाय समाजाचे नेतृत्व करणाऱ्या, देशासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि महत्त्वाच्या स्थळांची माहिती देणारे अनुबोधपट (डॉक्युमेंटरीज) या विभागाने तयार केले आहेत.

iv. आधुनिक भारताचा इतिहास अभ्यासण्याच्या दृष्टीने हे वृत्तपट व अनुबोधपट उपयुक्त आहेत.

**प्र.१.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[प्रत्येकी १ गुण]**

*१. भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार _______ येथे आहे.
अ. पुणे **ब. नवी दिल्ली**
क. कोलकता ड. हैदराबाद

२. आधुनिक कालखंडातील _______ लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत.
**अ. वृत्तपत्रे** ब. ग्रंथ
क. दूरदर्शन ड. टपाल तिकिटे

३. भारतातील बहुसंख्य वृत्तपत्रांसाठी सर्व महत्त्वाच्या घटनांचे प्राथमिक तपशील, महत्त्वाच्या विषयांवरील लेख यांसाठी _______ हा महत्त्वाचा स्रोत आहे.
अ. पिपल ट्रस्ट ऑफ इंडिया
**ब. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया**
क. पब्लिक ट्रस्ट ऑफ इंडिया
ड. अर्काइव्ह ट्रस्ट ऑफ इंडिया

४. १९९० च्या दशकात 'पीटीआयने' _______ तंत्राद्वारे देशभर बातम्या पाठवायला सुरुवात केली.
अ. टेलिप्रिंटरर्स
**ब. उपग्रह प्रसारण**
क. संवेदन
ड. अ आणि क दोन्ही

५. छापील माध्यमांत भारत सरकारच्या _______ विभागातर्फे काढण्यात येणाऱ्या वार्षिकांमधील माहिती विश्वसनीय असते.
अ. फिल्म ब. वृत्तपत्र
**क. प्रकाशन** ड. टपाल तिकीट

६. टपाल खाते राजकीय नेत्यांवर, फुलांवर, प्राणी-पक्ष्यांवर, एखाद्या घटनेवर, एखाद्या घटनेच्या रौप्य, सुवर्ण, अमृत महोत्सव, शतक, द्विशतक, त्रिशतकपूर्तीनिमित्त _______ काढते.
अ. लेख **ब. तिकीट**
क. दैनंदिनी ड. ज्ञानकोश

Sample Content

७. टपाल तिकीट या विषयात _______ हे जागतिक पातळीवरचे अभ्यासक होते.
अ. लालबहादूर शास्त्री ब. डॉ. फुलरेणू गुहा
**क. जाल कूपर** ड. डॉ. होमी सेठना

*८. भौतिक साधनांमध्ये _______ चा समावेश होत नाही.
अ. नाण्यां ब. अलंकारां
क. इमारतीं **ड. म्हणीं**

९. नोटा छापण्याचे काम _______ करते.
**अ. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**
ब. स्टेट बँक ऑफ इंडिया
क. बँक ऑफ इंडिया
ड. इंडियन बँक

१०. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख यांच्या _______ कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळत असे.
अ. भाषणांतून **ब. पोवाड्यांतून**
क. लेखांतून ड. पथनाट्यातून

*११. दृक्-श्राव्य साधनांमध्ये _______ या साधनाचा समावेश होतो.
अ. वृत्तपत्र **ब. दूरदर्शन**
क. आकाशवाणी ड. नियतकालिके

१२. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट _______ या संस्थेने तयार केले.
अ. पोस्टल डिपार्टमेंट
**ब. इंडियन न्यूज रिव्ह्यू**
क. नॅशनल अर्काइव्ह ऑफ इंडिया
ड. ब्रॉडकास्टिंग डिपार्टमेंट

१३. भारत सरकारने _______ मध्ये एफटीआयआय या संस्थेची स्थापना केली.
अ. २००० ब. १९८०
**क. १९६०** ड. २०१४

**प्र.१.(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.** **[प्रत्येकी १ गुण]**

*१.

| | व्यक्ती | विशेष |
|---|---|---|
| i. | जाल कूपर | टपाल तिकीट अभ्यासक |
| ii. | कुसुमाग्रज | कवी |
| iii. | अण्णाभाऊ साठे | लोकशाहीर |
| iv. | अमर शेख | चित्रसंग्राहक |

२.

| | संस्था | ठिकाण |
|---|---|---|
| i. | रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय | पुणे |
| ii. | छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय | मुंबई |
| iii. | भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार | नवी दिल्ली |
| iv. | फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया | पुणे |

**उत्तर :**
१. चुकीची जोडी : अमर शेख – चित्रसंग्राहक
बरोबर जोडी : अमर शेख – लोकशाहीर

२. चुकीची जोडी :
रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय – पुणे
बरोबर जोडी :
रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय – मुंबई

(**टीप :** परीक्षेमध्ये केवळ चुकीची जोडी लिहिणे अपेक्षित आहे; सर्व पाठांमध्ये दिलेली बरोबर जोडी ही केवळ विद्यार्थ्यांच्या आकलनाकरीता देण्यात आली आहे.)


**प्र.१.(क) संक्षिप्त रूपाचे पूर्ण रूप करा.** **[प्रत्येकी १ गुण]**


१. **PTI** २. **FTII**


**उत्तर :** १. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया
२. फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया

**प्र.२.(अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **[प्रत्येकी २ गुण]**

**संकल्पनाचित्रे पूर्ण करा.**

१.



२.



३.



Sample Content

**उत्तर :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | i. | लिखित साधने | ii. | भौतिक साधने |
| | iii. | मौखिक साधने | iv. | दृक्-श्राव्य साधने |
| २. | i. | नाणी | ii. | प्रार्थनास्थळे |
| | iii. | दैनंदिन वापरातील वस्तू | iv. | वजमुद्रा |
| | v. | अलंकार | vi. | वस्तुसंग्रहालय |
| | vii. | पेहराव | viii. | आधुनिक स्थापत्य |
| ३. | i. | दूरदर्शन | ii. | चित्रपट |
| | iii. | आंतरजाल | iv. | अनुबोधपट |

**तक्ता पूर्ण करा.**

**किमान ५ इतिहासाची साधने लिहून तक्ता पूर्ण करा.**

**१. लिखित साधने** **२. मौखिक साधने**

**उत्तर :**

१.

| इतिहासाच्या साधनांचे प्रकार | साधने |
|---|---|
| लिखित साधने | **वृत्तपत्रे** |
| | **टपालतिकिटे** |
| | **ग्रंथ** |
| | **पत्रव्यवहार** |
| | **सरकारी गॅझेट** |

२.

| इतिहासाच्या साधनांचे प्रकार | साधने |
|---|---|
| मौखिक साधने | **लोककथा** |
| | **लोकगीते** |
| | **म्हणी** |
| | **ओव्या** |
| | **पोवाडे** |

**प्र.२.(ब) टिपा लिहा.** **[प्रत्येकी २ गुण]**

***१. लिखित साधने**

**उत्तर :**

i. यामध्ये वृत्तपत्रे, नियतकालिके, रोजनिशी, ग्रंथ, पत्रव्यवहार, अभिलेखागारातील कागदपत्रे, सरकारी गॅझेट, टपाल तिकिटे व कोशवाङ्मय यांचा समावेश होतो.

ii. यातील वृत्तपत्र आणि नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या विविध क्षेत्रांशी संबंधित बातम्या व लेख यांमुळे महत्त्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींची माहिती मिळते.

iii. टपाल तिकिटांवरूनही इतिहास माहीत होतो. तिकिटांच्या आकारांतील वैविध्य, विषयांतील नावीन्य, रंगसंगती यांवरून बदलत्या काळाविषयीची माहिती मिळते.

iv. भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याकडून प्रसिद्ध होणाऱ्या साहित्याचा उपयोग माहिती मिळवण्यासाठी होतो. ही माहिती विश्वसनीय असते.

**२. अभिलेखागार**

**उत्तर :**

i. ऐतिहासिक कागदपत्रे किंवा दस्तावेजांचे ज्या ठिकाणी जतन केले जाते, त्या ठिकाणाला अभिलेखागार असे म्हणतात.

ii. नवी दिल्ली येथे भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार आहे.

iii. याचे वैशिष्ट्य म्हणजे हे आशिया खंडामधील सर्वांत मोठे अभिलेखागार आहे.

iv. अभिलेखागारातील कागदपत्रांचा समावेश इतिहासाच्या लिखित साधनांमध्ये होतो.

***३. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (PTI)**

**उत्तर :**

i. १९५३ नंतर भारतातील बहुतांशी वृत्तपत्रांकरता सर्व महत्त्वपूर्ण घटनांचे प्राथमिक तपशील व महत्त्वपूर्ण विषयांसंबंधित लेख यांसाठी 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया' हा महत्त्वाचा आणि विश्वसनीय स्रोत आहे.

ii. वृत्तपत्रांना वृत्तलेख, छायाचित्रे, वैज्ञानिक व आर्थिक विषयांवरील लेख पुरवण्याचे काम 'पीटीआयने' केले आहे.

iii. सुरुवातीला 'पीटीआय' टेलिप्रिंटर्सद्वारे बातम्या पाठवत असे. १९९० च्या दशकात त्यांनी टेलिप्रिंटर्सऐवजी 'उपग्रह प्रसारण' तंत्राद्वारे देशात सर्वत्र बातम्या पाठवण्यास सुरुवात केली.

iv. यातील मजकूर आधुनिक भारताच्या इतिहासलेखनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

**४. INDIA 2000**

**उत्तर :**

i. भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याने INDIA 2000 हा वार्षिक संदर्भग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

ii. हा संदर्भग्रंथ 'संशोधन, संदर्भ व प्रशिक्षण' विभागाअंतर्गत तयार केला आहे.

iii. या ग्रंथामध्ये भूमी, लोक, राष्ट्रीय प्रतीके, राजकीय व्यवस्था, संरक्षण, शिक्षण, सांस्कृतिक घटना, विज्ञान व तंत्रज्ञानातील घडामोडी, पर्यावरण, आरोग्य व कुटुंब कल्याण, समाजकल्याण, प्रसारमाध्यमे, मूलभूत आर्थिक माहिती, अर्थपुरवठा, नियोजन, कृषी, जलसंधारण, ग्रामीण विकास, अन्न व नागरी पुरवठा, ऊर्जा, उद्योग, व्यापार, वाहतूक, संदेशवहन, श्रम, गृहयोजना, न्याय व विधी, युवा व क्रीडा विभाग इत्यादी क्षेत्रांमधील घटनांचा आढावा, सर्वसाधारण उपयुक्त माहिती यांचा समावेश आहे.

iv. ही माहिती विश्वसनीय असल्याने याआधारे इतिहास लिहिणे शक्य होते.

Sample Content

**५. नाणे : एक भौतिक साधन**

**उत्तर :**

i. नाण्याचा समावेश इतिहासाच्या भौतिक साधनांमध्ये होतो.

ii. नाण्यांच्या माध्यमातून आणि बदलत गेलेल्या नोटांच्या छपाईमधून इतिहास माहीत होतो.

iii. १९५० पासून ते आजतागायतची नाणी, त्यांत वापरलेले धातू, त्यांचे आकार व त्यांवरील विषयवैविध्य यांवरून समकालीन भारतातील महत्त्वाच्या प्रश्नांविषयक माहिती मिळते.
उदा. लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्याचा संदेश देणारी नाणी, शेती व शेतकऱ्यांचे महत्त्व सांगणारी नाणी.

**ज्ञानगुरू**



नाणी पाडण्याचे काम भारत सरकार करते, तर नोटा छापण्याचे काम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया करते.

**६. मौखिक साधने**

**उत्तर :**

i. इतिहासाच्या अभ्यासाच्या विविध साधनांपैकी मौखिक साधन हे महत्त्वाचे साधन आहे.

ii. यामध्ये लोककथा, लोकगीते, म्हणी, ओव्या इत्यादींचा समावेश होतो.

iii. या साधनांद्वारे तत्कालीन लोकजीवनाचे विविध पैलू, तसेच सामाजिक परिस्थिती यांची माहिती मिळते.

iv. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख यांच्या पोवाड्यांतून लोकांना प्रेरणा मिळत असे.

**७. आधुनिक काळातील इतिहासाची दृक्-श्राव्यसाधने**

**उत्तर :**

i. एकविसाव्या शतकामध्ये काळ वेगान बदलत असल्याने इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने काही नवीन साधने समोर येत आहेत.
उदा. घरगुती टेलिफोन ते आताचे स्मार्ट मोबाइल फोन यांदरम्यान 'पेजर' नावाचे संपर्काचे साधन आले; मात्र ते लगेच मागेही पडले.

ii. इंटरनेटच्या (आंतरजाल) उपलब्धतेमुळे प्रचंड माहिती स्मार्ट फोनच्या माध्यमातून काही क्षणांत आपल्या हाती मिळते.

iii. इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने या माहितीचा उपयोग होतो; परंतु तिची सत्यता व यथार्थता तपासून घेणे गरजेचे आहे.

**प्र.३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.** [प्रत्येकी २ गुण]

***१. टपाल खाते टपाल तिकिटांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा वारसा व एकात्मता यांच्या जतनाचे प्रयत्न करते.**

**उत्तर :**

i. भारताच्या स्वातंत्र्यापासून आजतागायत भारतीय टपाल तिकिटांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे बदल घडून आलेले आहेत.

ii. टपाल खाते फुले, पक्षी-प्राणी, राजकीय नेते, एखादी घटना यांवर, तसेच एखाद्या घटनेच्या रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सव, शतक, द्विशतक व त्रिशतकपूर्ती निमित्त तिकीट काढते.

iii. तिकिटांच्या आकारांतील वैविध्य, विषयांतील नावीन्य, रंगसंगती यांमुळे टपाल तिकिटांच्या माध्यमातून बदलत्या काळाविषयक माहिती मिळते. हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा असतो.

यावरून असे म्हणता येईल, की टपालखाते टपाल तिकिटाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा वारसा व एकात्मता यांच्या जतनाचे प्रयत्न करते.

**२. वस्तुसंग्रहालयांद्वारे इतिहास समजण्यास मदत होते.**

**उत्तर :**

i. भारतातील सर्वच राज्यांमध्ये त्या त्या राज्यांची वैशिष्ट्ये सांगणारी वस्तुसंग्रहालये आहेत.
उदा. मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय.

ii. सरकारी संग्रहालयांव्यतिरिक्त काही संग्राहकांची स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण अशी संग्रहालये आहेत.

iii. नोटा, नाणी, विविध आकारांतील दिवे, अडकित्ते, क्रिकेटचे साहित्य असणारी अशी वस्तुसंग्रहालये आहेत.

यांवरून असे म्हणता येईल, की भौतिक साधनांद्वारे इतिहासाची माहिती समजण्यास वस्तुसंग्रहालयाची मदतच होते.

**ज्ञानगुरू**

ऐतिहासिक, वैज्ञानिक, कलात्मक किंवा सांस्कृतिक वस्तूंचा व्यवस्थितरित्या संग्रह व प्रदर्शन करणारी संस्था म्हणजे वस्तुसंग्रहालय होय.



***३. आधुनिक भारताचा इतिहास लिहिण्यासाठी दृक्-श्राव्य माध्यमे महत्त्वाची असतात.**

**उत्तर :**

i. एखादी गोष्ट कानाने ऐकत असताना त्या संदर्भातील दृश्ये पाहता येणे ज्या माध्यमांद्वारे किंवा साधनांद्वारे शक्य होते, त्यांना दृक्-श्राव्य माध्यम किंवा साधने असे म्हणतात. उदा. दूरदर्शन, चित्रपट, अनुबोधपट, आंतरजाल व विविध वाहिन्या.

ii. या माध्यमांद्वारे भारतीय समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती, देशाकरता योगदान देणाऱ्या व्यक्ती व

Sample Content

महत्त्वाच्या स्थळांविषयी माहिती देण्यासाठी अनुबोधपट पुणे येथील 'फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' ही संस्था तयार केलेली आहे.

iii. तसेच राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट 'इंडियन न्यूज रिव्ह्यू' या संस्थेने तयार केले आहेत.

iv. इतिहास अभ्यासण्यासाठी हे वृत्तपट व अनुबोधपट उपयोगी आहेत, कारण ते पुन्हा पुन्हा पाहता व ऐकता येतात.

म्हणून आधुनिक भारताचा इतिहास लिहिण्यासाठी दृक्-श्राव्य माध्यमे महत्त्वाची असतात.

**प्र.४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. [प्रत्येकी ३ गुण]**

**१. वृत्तपत्रांचे इतिहासलेखनातील महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर :**

i. वृत्तपत्रे ही माहिती देणारी प्रमुख साधने आहेत.

ii. आधुनिक काळातील वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते.

iii. १९६१ ते २००० या दरम्यानच्या काळात सुरुवातीस वृत्तपत्रांना पर्याय नव्हता, त्यानंतरच्या उदारीकरणामुळे इंटरनेटचा प्रसार झाला असला तरीही या छापील माध्यमाचे महत्त्व आणि विश्वसनीयता अजूनही टिकून आहे.

iv. वृत्तपत्रांमधून आपल्याला राजकीय, कला, क्रीडा साहित्य, संस्कृती इत्यादी संबंधित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडी माहीत होतात.

v. काही राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रांच्या प्रादेशिक आवृत्त्याही असल्याने त्यांच्या विविध विषयांवरील पुरवण्यांतून माहिती मिळते.

vi. काही वृत्तपत्रे वर्षाच्या शेवटी वर्षभरातील महत्त्वपूर्ण घटनांचा आढावा घेणाऱ्या पुरवण्याही काढतात, यामुळे आपल्याला वर्षभरातील प्रमुख घटना समजायला मदत होते.

vii. १९५३ नंतर भारतातील बहुसंख्य वृत्तपत्रांना 'पीटीआयने' छायाचित्रे, वृत्तलेख, आर्थिक व वैज्ञानिक विषयांवरील लेख पुरवले. यांची विश्वसनीयता वादातीत आहे, त्यामुळे इतिहासलेखनाच्या दृष्टीने यातील मजकूर महत्त्वाचा आहे.

**२. जाल कूपर यांच्याविषयी माहिती लिहा.**

**उत्तर :**

i. जाल कूपर यांनी टपाल तिकिटांच्या क्षेत्रात फार मोठे योगदान दिले आहे.

ii. त्यांनी 'इंडियाज स्टॅम्प जर्नल'चे संपादन केले असून भारतातील पहिल्या टपाल तिकीट संग्राहक ब्युरोचे ते संस्थापक होते.

iii. त्यांनी 'एम्पायर ऑफ इंडिया फिलाटेलिक सोसायटी'ची स्थापना केली.

iv. तसेच, कूपर यांनी तिकीट संग्रह करण्याच्या आपल्या या छंदाला शास्त्रीय स्वरूप देऊन भारतीय टपाल तिकिटांचा अभ्यास जागतिक पातळीवर नेला.

v. जाल कूपर यांचे टपाल तिकिटासंबंधित योगदान लक्षात घेऊन १९७७ मध्ये भारत सरकारने जाल कूपर हे टपाल तिकीट प्रसिद्ध केले.

**३. 'एफटीआयआय' चे आधुनिक इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने योगदान लिहा.**

**उत्तर :**

i. १९६० मध्ये भारत सरकारने पुणे येथे लोकशिक्षणाच्या उद्देशाने 'एफटीआयआय' ही संस्था स्थापन केली.

ii. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा व संस्कृती अशा विविध क्षेत्रांमधील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट 'इंडियन न्यूज रिव्ह्यू' या संस्थेने तयार केलेले आहेत.

iii. तसेच, समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व देशासाठी योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती आणि देशातील महत्त्वाच्या स्थळांची माहिती देणारे अनुबोधपटदेखील या विभागाने तयार केलेले आहेत.

iv. हे वृत्तपट व अनुबोधपट भारताचा आधुनिक इतिहास अभ्यासण्यासाठी उपयोगी ठरतात.

**चित्राचे निरीक्षण करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१.**




**i. हे नाणे कोणत्या वर्षातील आहे ?**

**ii. नाणे कोणत्या देशाचे आहे हे कशावरून समजते ?**

**iii. त्या देशातील चलन कोणते आहे व नाण्याचे मूल्य काय ?**

**iv. नाण्यावरून देशाची कोणती वैशिष्ट्ये माहीत होतात ?**

**उत्तर :**

i. सदर नाणे १९७० या वर्षातील आहे.

ii. चित्रातील नाण्यावर इंग्रजी व देवनागरी लिपीतील अक्षरांवरून हे नाणे भारताचे असल्याचे समजते.

iii. रुपया हे भारताचे चलन असून चित्रातील नाणे एक रुपयाचे आहे.

iv. अ. नाण्यावरील एक (1) या इंग्रजी अंकाच्या दोन्ही बाजूंस कणसांचे चित्र आहे यावरून भारत हा देश कृषिप्रधान देश असल्याचे माहीत होते.

ब. तसेच, नाण्याच्या दुसऱ्या बाजूच्या चित्रात देशाच्या राजमुद्रेचे चित्र आहे व त्यावर सिंह, घोडा, बैल, चक्र यांचे चित्र आहे.

Sample Content

## पाठांतर्गत प्रश्न

१. **करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३)

**एखाद्या घटनेचे साहित्यात प्रतिबिंब उमटते आणि कवी एखाद्या घटनेकडे कसे बघतो याचे एक उदाहरण कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'आवाहन' या भारत-चीन युद्‌धाच्या पार्श्वभूमीवर रचलेल्या कवितेत आहे. अशा प्रकारच्या अनेक घटनांवर आधारित लिहिलेल्या साहित्याचा शोध घ्या.**

**उत्तर :**

i. साहित्यातील अनेक रचनांमध्ये विविध ऐतिहासिक घटनांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते.

उदा. अगदी शिवरायांच्या काळातील बाजीप्रभू देशपांडे यांचे घोडखिंडीमध्ये झालेल्या युद्‌धाच्या वेळचे मनोगत व्यक्त करणारी कविता 'सरणार कधी रण प्रभू तरी, हे कुठवर साहू घाव शिरी', तसेच भारत-चीन युद्‌धाच्या काळातील सैनिकांचे आवाहन व्यक्त करणारे काव्य 'ए, मेरे वतन के लोगो...' किंवा 'उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू....' असे अभिमानाने सांगणाऱ्या सैनिकांचे मनोगत व्यक्त करणाऱ्या गीतांचा शोध घेता येईल.

ii. त्याचबरोबर मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. उदा. 'श्रीमानयोगी', 'शिकस्त', 'पानिपत', 'कादंबरीमय शिवकाल' इत्यादी

२. **करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४)

**देशभक्ती या विषयाशी संबंधित कोणकोणते चित्रपट तुम्हांला ठाऊक आहेत? तुम्हांला आवडलेल्या एका चित्रपटाचे रसग्रहण तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर :**

i. मराठी भाषेमध्ये छोटा जवान, लोकमान्य, वासुदेव बळवंत फडके, वीर सावरकर इत्यादी चित्रपट, तर हिंदी भाषेमध्ये सैनिक व युद्‌धासंबंधित अनेक चित्रपट जसे- बॉर्डर, एल. ओ. सी. इत्यादी. याशिवाय गांधी, शहीद, जमीन, लक्ष्य यांसारख्या चित्रपटांची नावे सांगता येतील.

ii. यांपैकी 'बॉर्डर' हा चित्रपट मला आवडतो. या चित्रपटात १९७१ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्‌धादरम्यान लोंगोवाल या भारतातील राजस्थान सीमेवरील ठिकाणी भारतीय सैनिकांनी केलेल्या पराक्रमाचे चित्रण केले आहे.

सुरुवातीला या युद्धासाठी ज्या ज्या अधिकाऱ्यांच्या व जवानांच्या नेमणुका केल्या होत्या त्यांचे कुटुंब कर्तव्यापेक्षाही देशाविषयीच्या कर्तव्याला दिलेले प्राधान्य याविषयी चित्रपटामध्ये दाखवलेले आहे. त्यानंतर प्रत्यक्ष रणभूमीवरील युद्‌धाची तयारी, सीमावर्ती भागातील लोकांना सुखरूप हलवून गावे रिकामी करण्यासाठी सैनिक कसे प्रयत्न करतात, याविषयी चित्रण केले आहे. सैनिकाची आपल्या मातृभूमीविषयी समरसता यातील एका प्रसंगातून दिसून येते, की ज्यामुळे तो आपल्या मातृभूमीवर हल्ला करणाऱ्या पाकिस्तानच्या गुप्तहेरांना ओळखून त्यांना ठार करतो.

या चित्रपटात दाखवलेली रणभूमी पाहून खरोखरच सैनिक अशा वाळवंटात स्वतःचे मन कसे खंबीर व कर्तव्याप्रति जागरूक ठेवू शकतात याचे कौतुक वाटते, कारण कुटुंबियांच्या आठवणीने हळवे होणारे सैनिक युद्‌धप्रसंगी केवळ देशप्रेमानेच भारलेले असतात हे चित्रपटात उत्कृष्टतेने दाखवले आहे. शेवटच्या प्रसंगामध्ये तर भारतीय भूदलाच्या पंजाब रेजिमेंटचे केवळ १२० जवान असतात आणि त्यांना वरिष्ठांकडून माघारी येण्याचा आदेश असूनही उत्तम नेतृत्व व देशप्रेमाची भावना यांमुळे हे जवान पाकिस्तानच्या टँक रेजिमेंट व सैन्याच्या मोठ्या तुकडीलाही सामोरे जातात. त्यातील बहुतांशी शहीद होतात. जखमी अवस्थेतही शेवटच्या श्वासापर्यंत लढण्याची सैनिकांची जिद्द या चित्रपटात दाखवण्यात आली आहे.

देशभक्ती म्हटली, की केवळ सैनिकच आपल्या डोळ्यांपुढे येतो ते त्याच्या शौर्यामुळेच. असे असले तरीही प्रत्येकामध्ये देशभक्ती जागृत करण्याचे काम असे चित्रपट करत असतात असे वाटते.

**[टीप :** वरील उत्तर उदाहरण दाखल देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना व्यतिरिक्त इतर चित्रपटाचेहा रसग्रहण करता येईल.**]**

## उपक्रम

*१. **शाळेचे हस्तलिखित / वृत्तपट तयार करा.**

(विद्यार्थ्यांनी वरील उपक्रम स्वतः करावा.)

*२. **Archaeological Survey of India या भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावरील विविध माहितीपट पाहा.**

(विद्यार्थ्यांनी सदर उपक्रम स्वतः करावा.)

*३. **तुमच्या गावाचा इतिहास लिहिण्यासाठी कोणती साधने वापराल? त्या साधनांच्या साहाय्याने तुमच्या गावाचा इतिहास लिहा.**

**[टीप :** विद्यार्थ्यांना गावाचा इतिहास लिहिण्यापूर्वी त्या संदर्भातील पुढील साधनांचा व मुद्द्यांचा उपयोग होईल.**]**

i. ग्रामपंचायतीतील गावाच्या व्यवहारासंबंधित पत्रे / कागदपत्रे.

ii. गावातील विविध प्राचीन वास्तू किंवा त्यांचे अवशेष.

iii. गावातील वरिष्ठ नागरिकांच्या या संदर्भातील मुलाखती.

पाठाची उजळणी उत्तरांसह पाहण्याकरिता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. IX:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

## PERFECT SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- History, Political Science and Geography
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

### Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. IX & X)
  - Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- 3 in 1 Writing Skills
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- 3 in 1 Grammar (Language Study) & Vocabulary
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्) – SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्) – SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Statponery

**Visit Our Website**

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning



Explore our range of
STATIONERY

B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z, Wagle Industrial Estate, Thane (W)-400604 | 88799 39712 / 14 | 88799 39713 / 15

www.targetpublications.org mail@targetpublications.org